# कुलगुरू निवड; अर्ज प्रक्रिया अंतिम टप्प्यात



**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ नवीन कुलगुरू निवडीसाठी अर्ज प्रक्रियेची मुदत २ जुलै रोजी संपणार आहे. त्या पार्श्वभूमीवर इच्छुकांकडून अर्ज दाखल केले जात असून प्रक्रियेस गती आली आहे.

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांची मुदत १७ जून रोजी संपली. त्या पार्श्वभूमीवर नव्या कुलगुरूंच्या निवडीच्या प्रक्रियेस प्रारंभ झाला असून २ जुलैपर्यंत अर्जप्रक्रिया सुरू राहणार आहे. राज्य विद्यापीठाच्या अधिनियमानुसार ही निवड केली जाणार असून यासाठी तीन सदस्यीय निवड समिती तयार करण्यात आली आहे. अर्ज प्रक्रियेतील समाविष्ट नावे अद्याप गुलदस्त्यात असली तरी विद्यापीठ कार्यक्षेत्रात याची चर्चा रंगू लागली आहे.

# विद्यापीठाच्या रोजगार कक्षातर्फे आजपासून ऑनलाईन प्रशिक्षण

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मध्यवर्ती रोजगार कक्षातर्फे मंगळवार (दि. ३० जून) पासून 'संवाद व रोजगाराभिमुख कौशल्ये' या विषयावर दहा दिवसीय ऑनलाईन प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हे प्रशिक्षण मोफत असणार आहे. यासाठी गुगल फॉर्मद्वारे नोंदणी आवश्यक आहे. यात ऑर्गनायझेशनल स्ट्रक्चर, पब्लिक स्पीकिंग, प्रेझेंटेशन स्किल्स, ई-मेल एटिकेट, ग्रुमिंग, ग्रुप डिस्कशन व पर्सनल इंटरव्ह्यू याबाबत प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

# कुलगुरू पदासाठी ११ जणांचे अर्ज

## गुरुवारपर्यंत मुदत; अधिविभागातील ७ प्राध्यापक अर्ज

कोल्हापूर, ता. २९ : शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरू पदासाठी कोल्हापूर, सांगली आणि सातारा येथून ११ जणांनी अर्ज केले आहेत. विद्यापीठ अधिविभागातील ७ प्राध्यापकांचाही यामध्ये समावेश आहे. काही स्वायत्त विद्यापीठाच्या प्रमुखांनीही यासाठी अर्ज केल्याची माहिती समोर आली आहे. गुरुवारी (ता. २) अर्ज करण्याचा अखेरचा दिवस आहे.

माजी कुलगुरू देवानंद शिंदे यांचा कार्यकाल संपल्याने कुलगुरू पद रिक्त झाले. सध्या प्रभारी कुलगुरू म्हणून डॉ. नितीन करमळकर यांच्याकडे



पदभार आहे. कुलगुरू निवडीची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. यासाठी शोध समितीही नेमली आहे. गुरुवारी यासाठी ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम मुदत आहे. गेल्या पंधरा दिवसांत या पदासाठी कोल्हापूर, सांगली, सातारा येथून ११ जणांनी अर्ज केले असून, यामध्ये प्राचार्य, विद्यापीठ अधिविभागप्रमुख, प्राध्यापक यांचा समावेश आहे.

विद्यापीठातील अधिविभागातील सात जणांनी अर्ज केल्याचे समजते. यामध्ये भौतिकशास्त्र आणि अर्थशास्त्र विभागातील प्रत्येकी दोन प्राध्यापकांचा समावेश आहे. याशिवाय जैवतंत्रज्ञान विभाग, रसायनशास्त्र विभाग, संख्याशास्त्र विभागातूनही प्राध्यापकांनी अर्ज केले आहेत. काही स्वायत्त महाविद्यालये आणि विद्यापीठांमधूनही कुलगुरू पदासाठी काही जण इच्छुक असून, त्यांनीही अर्ज केले आहेत.

# संवाद, रोजगाराभिमुख कौशल्यावर प्रशिक्षण

कोल्हापूर, ता. २९ : शिवाजी विद्यापीठाच्या मध्यवर्ती रोजगार कक्षातर्फे मंगळवारपासून (ता. ३०) 'संवाद व रोजगाराभिमुख कौशल्ये' या विषयावर दहादिवसीय ऑनलाईन प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.

रुबिकॉन ट्रेनिंग प्रा. लि. कंपनीच्या सहकार्याने हे प्रशिक्षण मोफत होणार आहे. रोज दोन तास चालणाऱ्या या प्रशिक्षण कार्यक्रमासाठी गुगल फॉर्मद्वारे नोंदणी आवश्यक आहे. यात ऑर्गनायझेशनल स्ट्रक्चर, पब्लिक स्पिकिंग, प्रेझेंटेशन स्किल्स, ई-मेल एटिकेट, ग्रुमिंग, ग्रुप डिस्कशन आणि पर्सनल इंटरव्ह्यू, या विषयांबाबत प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

# शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरुपदासाठी ११ अर्ज

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरुपदासाठी सोमवारपर्यंत अकराजणांनी अर्ज केले आहेत. त्यामध्ये विद्यापीठ परिक्षेत्रातील कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांमधील प्राचार्य, प्राध्यापकांचा समावेश आहे. या पदासाठी ऑनलाईन अर्ज करण्याची मुदत गुरुवार (दि. २ जुलै) पर्यंत आहे.

कुलगुरुपदासाठी यथोचित व्यक्तीची शिफारस करण्यासाठी कुलपतींनी त्रिसदस्यीय शोध समिती तयार केली आहे. या समितीने दि. ३ जूनपासून ऑनलाईन आणि प्रत स्वरुपात अर्ज मागविण्याची प्रक्रिया सुरु केली. सोमवारपर्यंत या समितीकडे अकराजणांनी अर्ज केले आहेत. त्यात सांगलीतील भारती विद्यापीठाच्या डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे, विवेकानंद शिक्षण संस्थेचे सहसचिव (अर्थ) प्राचार्य डॉ. आर. व्ही. शेजवळ यांच्यासह विद्यापीठातील विविध अधिविभागांचे प्रमुख आणि प्राध्यापक अशा एकूण सातजणांचा समावेश आहे. विद्यापीठातील अर्थशास्त्र आणि भौतिकशास्त्र विभागातील प्रत्येकी दोन, तर संख्याशास्त्र, जैवतंत्रज्ञान आणि रसायनशास्त्र विभागांतील प्रत्येकी एका प्राध्यापकाचा समावेश आहे. मुंबई आणि पुणे येथील दोन प्राध्यापकांचे अर्ज असल्याचे समजते. गुरुवारपर्यंत अर्ज करण्याची मुदत आहे. दरम्यान, उमेदवारांनी त्यांची वैयक्तिक माहिती, विहित नमुन्यात उमेदवारीबाबतचे दोन पानी समर्थन, विद्यापीठाकरिता दोन पानी भविष्यलक्षी योजना, कार्याची नीट ओळख असलेल्या तीन नामांकित व्यक्तींची नावे, संपर्क ही माहिती अर्जासमवेत सादर केली आहे.

## समिती निर्णय घेईल

या पदासाठी समितीने केलेल्या आवाहनानुसार ऑनलाईन आणि संगणकीय प्रत या स्वरुपात अर्ज दाखल होत आहेत. अर्ज करण्यास दोन दिवसांची मुदत राहिली आहे. प्राप्त होणाऱ्या अर्जांवरील पुढील कार्यवाहीबाबतचा निर्णय शोध समिती घेईल, असे या प्रक्रियेचे संपर्क अधिकारी केंद्रीय मनुष्यबळ संचालनालयातील अतिरिक्त संचालक आर. के. जैन यांनी सोमवारी सांगितले.

# रोजगार कक्षातर्फे आजपासून प्रशिक्षण

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मध्यवर्ती रोजगार कक्षातर्फे आज, मंगळवारपासून 'संवाद व रोजगाराभिमुख कौशल्ये' या विषयावर दहा दिवसीय ऑनलाईन प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. रोज दोन तास चालणाऱ्या या प्रशिक्षण कार्यक्रमासाठी नोंदणी आवश्यक आहे. यामध्ये ऑर्गनायझेशनल स्ट्रक्चर, पब्लिक स्पिकिंग, प्रेझेंटेशन स्कील्स, ई-मेल एटिकेट, ग्रुमिंग, ग्रुप डिस्कशन आणि पर्सनल इंटरव्ह्यू या विषयांबाबत प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

# 'नॅड सेल' स्थापन करण्याचे यूजीसीकडून विद्यापीठांना निर्देश

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** देशभरातील केंद्रीय, राज्य, खासगी आणि अभिमत विद्यापीठांमध्ये नॅशनल अ‍ॅकॅडमिक डिपॉझिटरी कक्ष (नॅड सेल), समन्वयक अधिकारी नियुक्त करावा. तसेच, विद्यापीठांनी विद्यार्थ्यांना नॅडच्या संकेतस्थळावर नोंदणी करण्याची सूचना द्यावी, असे निर्देश विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) दिले आहेत.

विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रमाणपत्रे डिजिटल माध्यमात साठवण्यासाठी केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाने 'नॅशनल अ‍ॅकॅडमिक डिपॉझिटरी'



(नॅड) या योजनेला मान्यता दिली आहे. या योजनेच्या अंमलबजावणीची जबाबदारी यूजीसीकडे देण्यात आली आहे. या अनुषंगाने यूजीसीने विद्यापीठांना त्यांच्याकडील विद्यार्थ्यांची माहिती नॅशनल अ‍ॅकॅडमिक डिपॉझिटरीकडे देण्यास सांगण्यात आले होते. डिजिलॉकरच्या सहकार्याने 'नॅड' कार्यान्वित असेल. पूर्वीच्या एनडीएमएल आणि सीव्हीएल आता नॅडचा भाग नाहीत. त्यामुळे त्यांच्याकडे असलेला सर्व विदा डिजिलॉकरला हस्तांतरित करण्याची सूचना देण्यात आल्याचेही यूजीसीने स्पष्ट केले आहे.

नॅडच्या अंमलबजावणीसाठी विद्यापीठांनी त्यांच्याकडील विद्यार्थ्यांचा विदा डिजिलॉकरवर उपलब्ध करून द्यावा. विद्यापीठांमध्ये नॅड कक्ष स्थापन करावा, त्यासाठी समन्वयक अधिकाऱ्याची नियुक्ती करावी, विद्यार्थ्यांना नॅडच्या संकेतस्थळावर नोंदणी करण्यास सांगावे, असेही यूजीसीचे सचिव प्रा. रजनीश जैन यांनी परिपत्रकात नमूद केले आहे.



कोल्हापुरातील न्यू कॉलेजचा सुवर्णमहोत्सव शुक्रवारपासून सुरु झाला. त्यानिमित महाविद्यालयाच्या आवारात फलक लावण्यात आला. यावेळी संस्थेचे पदाधिकारी, प्राचार्य व प्राध्यापक असे मान्यवर उपस्थित होते.

# न्यू कॉलेजचा सुवर्णमहोत्सव सुरु

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शाहू महाराजांनी स्थापन केलेल्या येथील शिवाजी पेठेतील प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊसच्या न्यू कॉलेजचा सुवर्णमहोत्सव शाहू जयंतीचे औचित्य साधून शुक्रवारी सुरु झाला. यानिमित्त वर्षभर विविध शैक्षणिक उपक्रमांचे आयोजन केले जाणार आहे. बहुजन समाजाच्या शिक्षणाची दारे खुली व्हावीत, यासाठीच हे महाविद्यालय १९७१ मध्ये सुरु झाले. आतापर्यंतच्या वाटचालीत गुणवत्तेच्या पातळीवर या महाविद्यालयाने नावलौकिक मिळवला आहे.

दिवंगत प्राचार्य रा. कृ. कणबरकर हे या महाविद्यालयाचे पहिले प्राचार्य. त्यांनी या महाविद्यालयाचा सर्वच पातळ्यांवर भक्कम पाया घातला. तेव्हापासून महाविद्यालयाची शिक्षणापासून ते कला-क्रीडा या बाबतीत घोडदौड सुरु आहे. एक दर्जेदार महाविद्यालय म्हणून या महाविद्यालयाची ओळख तयार झाली आहे. पालक मुलींच्या शिक्षणासाठी कायमच या महाविद्यालास प्राधान्य देतात.

महाविद्यालयाच्या आवारात सुवर्ण महोत्सवाचा भला मोठा फलक लावण्यात आला. या फलकाचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष बी. जी. बोराडे, उपाध्यक्ष डी. जी. किल्लेदार, संचालक ए. जी. चपिरे, के. जी. पाटील, विनय पाटील, डॉ. पी. के. पाटील, सई खराडे, सविता पाटील, आर. डी. पाटील, सध्याचे प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील उपस्थित होते.